# येशूला झाडात लपलेला चोर दिसला

## मुलांना पाश्चात्ताप करण्यास साहाय्य करा

मुलांचे वयोगट आणि गरजा यानुसार कार्यक्रम निवडा.

मोठया मुलाने किंवा शिक्षकांनी लूक 19:1-10 मधून जक्कयचा कथावृत्तांत वाचून दाखववावा. यामध्ये पैश्याची चोरी करणाया पण येशूची भेट झाल्यावर पश्चाताप करणाया माणसाविषयी सांगितले आहे.

ह्या अभ्यासाच्या अखेरीस दिलेले चित्र मुलांना काढायला किंवा रंगवायला सांगा.

**विचारा :** (प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी उत्तरे दिली आहेत)

- जक्कय काम काय करीत असे? (पाहा वचन 2. कर गोळा करणारे जकातदार बरेचदा लोकांकडून जास्तीचे पैसे वसूल करती असत. हा जास्तीचा पैसा ते स्वत:कडे ठेवीत. यातूनच ते अधिक श्रीमंत झाले होते. असा पैसा जमवणारे ते एक प्रकारे चोरच होते).
- जक्कय झाडावर चढून बसला (पाहा वचन 3)
- जक्कयला क्षमा केल्याचे येशूने कसे दाखवले? (पाहा वचन 5. येशू त्याच्या घरी जेवावयास गेला).
- येशूने क्षमा केल्याचे जक्कयला समजले. त्याबद्दलची कृतज्ञता त्याने कशी व्यक्त केली? (पाहा वचन 8)
- येशू कोणाला तारावयास आला? (पाहा वचन 10)

जक्कयच्या कथा वृत्तांताचे **नाट्यीकरण करा.** मुलांना ही छोटी नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढायांशी चर्चा करुन व्यवस्था करा. मुलांकडून चांगला सराव करुन घ्या. तुम्ही सर्वच भूमिका केल्या पाहिजेत असे नाही.

- **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात.

**निवेदक** कथावृत्तांताचा सारांश करुन मुलांकडून संवाद पाठ करुन घ्या.

**येशू**

**जक्कय.** नाणी म्हणून एका पिशवीत दगड किंवा कागद भरा.

- **लहान मुलांनी लोकसमुदायाची** भूमिका करावी.

**निवेदक :** कथावृत्तांताचा पहिला भाग सांगा (लूक 19:1-6) आणि मग म्हणा. ''लोक काय म्हणतात ते ऐका''

**लोक :** ''येशू येत आहे!''

''जक्कयकडे पाहा. तो झाडार चढत आहे!''

''माझ्याकडून कर घेताना त्याने जास्त पैसे घेतले.''

''थोडक्यात काय हा लहानसा माणूस मोठा दुष्ट आहे!''

''येशू त्याला शिक्षा करील, असे मला वाटते!''

**जक्कय :** खुर्चीवर चढून उभे राहा.

**येशू :** वर पाहून म्हणा, ''जक्कय, खाली ये आज मी जेवायला तुझ्या घरी येणार आहे.''

**निवेदक :** कथावृत्तांताचा दुसरा. भाग सांगा (वचन 7-10) आणि म्हणा, ''जक्कय काय म्हणतो ते ऐका.''



**जक्कय :** खुर्चीवरुन खाली उतरा आणि म्हणा, ''येशू माझ्या घरी येणार आहे तो मला क्षमा करतो! मी खूप आनंदात आहे! जे काही मी चोरुन घेतले त्यापेक्षा अधिक परत देईन!'' (लोकांना पिशवीतून पैसे दिल्याचा अभिनय करा) म्हणा, मी गरीबांना मदत करीन! हे पैसे मी तुला देतो घे.''

**येशू :** ''मी अशा प्रकारच्या माणसांचे तारण करावयास आलो आहे. जक्कय हरवलेला होता. पण आता त्याचे तारण झाले आहे!''

**लोक :** ''पाहा जक्कयने मला पैसे परत दिले!''

''येशूने अशा प्रकारच्या चोराचा पालट कसा केला?''

''देवाने माझ्याही पातकांची क्षमा करावी असे मला वाटते!''

**निवेदक :** नाटिका संपल्याचे जाहिर करुन मुलांचे आभार माना.

मुलांनी जक्कयच्या कथावृत्तांताचे नाट्यीकरण प्रौढ़ांसमोर सादर केले असेल तर आरंभी दिलेले प्रश्न त्यांनी मोठया माणसांना विचारावेत.

**मुलांना विचारा :** ''देवाने आपल्याला क्षमा केली त्याची कृतज्ञता आपण आणखी कोणत्या मार्गांनी व्यक्त करु शकतो?'' (मुलांना उदाहरणे सांगू द्या)

पैशाने भरलेल्या पिशवीचे चित्र काढा. मुलांना तसे काढायला सांगा. पुढच्या उपासनेच्या वेळी त्यांना हे चित्र मोठया माणसांना दाखवता येईल. देव आमची अंत:करणे कशा प्रकारे बदलतो हे चित्रा वरुन स्पष्ट होते असे स्पष्ट करून सांगा या मुळे देवावर प्रीती करणे हे पैशापेक्षा अधिक महत्वाचे ठरते.

**पाठ करा** यशया 1:18.

**कविता म्हणा :** तीन मुलांनी स्तोत्र 51:1,7 व 13 ह्यातून प्रत्येकी एक वचन म्हणावे.



**प्रार्थना :** ''प्रिय देवपित्या, तुझ्या आमच्यावरील अपार प्रेमाबद्दल आम्ही तुला धन्यवाद देतो. आम्ही हरवलेले-वाट चुकलेले असे पातकी असतांनाही तू आमचे तारण करण्यास आला. क्षमाशील अशा स्वभावामुळे तू आमची क्षमा करुन आम्हांला आनंदाने परिपूर्ण केलेस. नेहमीच कृतज्ञ भावाने तुझे उपकार मानण्याची आमची इच्छा आहे. इतर लोकांवर प्रेम करुन आमची प्रीती व्यक्त करण्याची आमची इच्छा आहे.''

Copyright 2005 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net